६५८
६

**खाजगी सूतगिरण्या, कापड गिरण्या व जिनिंग प्रेसिंग सहकारी संस्था यांना शेतक-यांकडून कच्चा कापूस खरेदी करण्यास परवानगी देणेबाबत...**

महाराष्ट्र शासन
शासन परिपत्रक क्र. कापूस-१००४/प्र.क्र.४५/१०-सी
सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक ६.११.२००४

वाचा :-शासन निर्णय सम क्र. दि.२४.८.२००४

शासन परिपत्रक संदर्भिय शासन दि.२४ऑगस्ट अन्वये हंगाम २००४-०५ मध्येही एकाधिकार कापूस खरेदी योजना राबविण्याचे धोरण शासनाने स्विकारले असून शासनातर्फे कापूस खरेदीही महाराष्ट्र कच्चा कापूस (प्रापण,संस्करण व पणन) अधिनियम १९७१ या कायदयातील तरतुदी प्रमाणे होणार आहे. या धोरणानुसार सहकारी/ खाजगी सूतगिरण्या, कापडगिरण्या , जिनिंग प्रेसिंग युनिटस् आणि कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडिया यांना देखील राज्यशासनाने विविध जातीच्या व प्रतीच्या कापसासाठी निर्धारित केलेल्या एकूण किमतीने कच्चा कापूस खरेदी करण्यास परवानगी देण्याचे ठरविले आहे. या हंगामात(२००४-२००५) कापूस खरेदी करण्याच्या संदर्भात खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१. हंगाम २००४-२००५ या हंगामाची कापूस खरेदी दिनांक ८ नोव्हेंबर २००४ पासून सुरु करण्यात यावी.

२. इच्छुक खरेदीदार संस्थांना कापूस खरेदीची अनुज्ञप्ती(Licence)कृषि उत्पन्न बाजारसमित्यांमार्फत देण्यात येईल.

३.सहकारी/खाजगी सूतगिरण्या, कापडगिरण्या, जिनिंग प्रेसिंग युनिटस् स्वतः किंवा त्यांच्या निजधारकास आणि कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडिया यांना कापूस खरेदीची अनुज्ञप्ती देण्यास व त्यासाठी त्यांना आवश्यक कागदपत्रासह संबधित कृषि उत्पन्न बाजारसमितीस विहित नमुन्यात अर्ज करावा लागेल. असा अर्ज प्राप्त झाल्यानंतर कृषि उत्पन्न बाजारसमितीने अर्जासोबत आवश्यक कागदपत्राची तपासणी करावी व अर्जदार संस्था अस्तित्वात असल्याची तसेच कापूस खरेदीसाठी अनुज्ञप्ती देण्यास पात्र आहे याची खात्री करुन महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (नियमन) अधिनियम १९६३ या कायदयातील तरतुदीस अनुसुरुन संबंधितांना खरेदीची अनुज्ञप्ती देण्यात यावी.

४. कोणत्याही खरेदीदार संस्थांना वेगवेगळया कृषि उत्पन्न बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात कापूस खरेदी करण्याची मुभा राहील . मात्र त्यांना संबधित कृषि उत्पन्न बाजार समितीकडून आवश्यक ती अनुज्ञप्ती मिळविणे बंधन कारक राहील .

५. अधिकृत केलेल्या मार्केटयार्डमध्ये लिलाव पध्दतीने कापूस खरेदी करण्यात यावी. अशा मार्केटयार्डच्या संस्थांना वेगवेगळया माध्यमाद्वारे व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी.

176 cotton

भाग कोणासही राज्यशासनातर्फे हंगाम २००४-२००५ करिता कापसासाठी निश्चित केलेल्या एकूण दरापेक्षा कमी दराने कापूस खरेदी करता येणार नाही अशी अट टाकावी.

६. कापूस विक्री करणा-या शेतक-यांना पंधरा(१५)दिवसांच्या आत नगदी/चेकने कापसाचे पेमेंट करणे बंधनकारक राहील. या तरतुदीचा भंग केल्यास संबंधितावर आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल. यावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी संबंधित कृषि उत्पन्न बाजारसमितीची राहील.

७. बाजार समितीच्या पूर्व परवानगी शिवाय खरेदीदारास कापूस कोणत्याही स्थितीत बाजार समितीच्या कार्यक्षेत्राबाहेर नेता येणार नाही .

८. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका / ग्रामीण विकास सहकारी बँकांच्या कर्जदाराचे येणे कर्ज दर्शविणारी यादी संबंधित सहाय्यक निबंधक सहकारी संस्था / जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांनी कृषि उत्पन्न बाजार समितीकडे दयावी खरेदीदाराकडून सहकारी बँकांची वसुली महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (नियमन) अधिनियम १९६३ मधील तरतूदी नुसार करणे बंधनकारक राहील .

९. खरेदी केलेल्या कापसासाठी खरेदीदारामार्फत लिलावानंतर देण्यात आलेली एकूण किंमत ही अंतिम किंमत असेल त्याशिवाय खरेदीदाराकडून इतर कोणतीही रक्कम कापूस विक्री करणा-यास देय राहणार नाही.

१०. खरेदीदार संस्थांनी खरेदी केलेल्या कापसाच्या पुढील प्रकियेच्या गुणवत्तेची अथवा अन्य कोणतीही भौतिक अथवा वित्तीय जबाबदारी महाराष्ट्र राज्य उत्पादक पणन महासंघ किंवा शासनाची राहणार नाही.

११. खरेदीदार संस्थांनी गुंतविलेल्या फॅक्टरीमध्ये आवश्यकता असल्यास पणन महासंघास देखील कापूस खरेदी करता येईल व आवश्यकतेप्रमाणे पणन महासंघाच्या खरेदी केलेल्या कापसावर जिनिंग/प्रेसिंग करता प्राधान्य द्यावे लागेल अशी अट टाकण्यात यावी.

१२.खरेदीदार संस्थांनी प्रत्येक आठवडयातील केलेली एकूण खरेदी, त्याची खरेदी किंमत व अदा करण्यात आलेली किंमत, प्रक्रियेबाबत स्थिती इत्यादी बाबतची माहिती विहित नमुन्यात कृषि उत्पन्न बाजारसमिती व संबंधित कार्यक्षेत्रातील सहाय्यक निबंधक(सहकारी संस्था)यांना देखील देणे बंधनकारक राहील अशी अट टाकण्यात यावी.

१३.कृषि उत्पन्न बाजार समितीने घातलेल्या कोणत्याही अटिचे उल्लंघन झाल्यास कापूस खरेदीची दिलेली परवानगी कोणतेही कारण नमुद न करता संपुष्टात आणण्याचा अधिकार कृषि उत्पन्न बाजार समितीस राहील.

१४. कोणत्याही कापूस उत्पादक शेतक-यास लिलावात भाग न घेता कापूस पणन महासंघास सरळ पद्धतीने कापूस विकण्याची मुभा राहील.